


'तान'च्या टुरिझम एक्स्पोचे उद्‌घाटन करताना पर्यटनमंत्री जयकुमार रावल. समवेत आमदार देवयानी फरांदे, आमदार बाळासाहेब सानप, ब्रिजमोहन चौधरी, 'तान'चे अध्यक्ष दत्ता भालेराव, लक्ष्मण सावजी आदी.

### धोरण विकासाचे | पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांची माहिती

# रामदास स्वामी मठाचा 'पर्यटन'कडून विकास

### 'तान'च्या टुरिझम एक्स्पोचे पर्यटनमंत्र्यांच्या हस्ते उद्‌घाटन

प्रतिनिधी | नाशिक

आगरटाकळी येथील पुरातन रामदास स्वामी मठ व मंदिर परिसराचा विकास केला जाणार असून, याकरिता पर्यटन विभागाने मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर केला आहे. याचबरोबर नाशिक शहर व नाशिक विभागाकरिता सर्वाधिक निधी मंजूर केला असून, महाबळेश्वरला पर्याय म्हणून इगतपुरीत वेलनेस सेंटर उभारले जाणार आहे. याचा फायदा ठाणे, मुंबई, नाशिकच्या पर्यटकांना होणार असल्याची माहिती राज्याचे पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांनी शुक्रवारी नाशिकमध्ये दिली.

ट्रॅव्हल एजंट्स असोसिएशन ऑफ नाशिक (तान)च्या वतीने 'टुरिझम एक्स्पो' इंद्रप्रस्थ हॉल येथे भरविला गेला आहे. ८ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या एक्स्पोच्या उद्‌घाटनप्रसंगी रावल बोलत होते. व्यासपीठावर आमदार देवयानी फरांदे, आमदार बाळासाहेब सानप, चौधरी यात्रा कंपनीचे संचालक ब्रिजमोहन चौधरी, तानचे अध्यक्ष दत्ता भालेराव, उपाध्यक्ष राजेंद्र बकरे, भाजपचे लक्ष्मण सावजी, सागर वाघचौरे, अंबरीश मोरे, मनोज वासवानी होते.

पर्यटनाबाबत कोकणाला जितके महत्त्व आहे, तितकेच नाशिकलाही आता मिळते आहे, याकडे लक्ष वेधत 'अतिथी देवो भव' ही संकल्पना मात्र आपल्याला रूजवावी लागणार असल्याचे रावल यांनी आवाहन केले. राज्य शासनाने २०१७ हे पर्यटनवर्ष म्हणून जाहीर केले आहे. 'महाराष्ट्र अनलिमिटेड' ही संकल्पना आमची असून राज्याला लाभलेला ७२० किलोमीटरचा निसर्ग समुद्र किनारा 'स्वदेश दर्शन' योजनेतून पर्यटकांना उपलब्ध करून दिला आहे. विभागीय आयुक्तांना 'नाशिक महोत्सव'चे आयोजनाबाबत सूचना केल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. रिक्षा चालकांनाही गाइड प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात वाइन उत्पादकांच्या वतीने जगदीश होळकर यांनी रावल यांचा सत्कार केला. तानचे माजी अध्यक्ष मिलिंद लोहकरे यांना अचिव्हमेंट-अवॉर्डने गौरविण्यात आले.

### परराज्यात वाइन टॅक्स फ्रीसाठी प्रयत्न

वाइन उत्पादक व द्राक्ष उत्पादकांच्या व्यथांची कल्पना असून, त्यांच्या मदतीकरिता परराज्यात वाइन करमुक्त व्हावी, याकरिता प्रयत्न सुरू असल्याचे रावल यांनी सांगितले. मुंबईत येणाऱ्या क्रूझव्दारे दोन हजार पर्यटक उतरतात. त्यांना नाशिककडे वाइन टुरिझमसाठी वळविण्यासाठी कंपनीशी बोलणे सुरू असल्याचे रावल यांनी सांगितले.

### बोट क्लबच्या बोटी येथेच राहणार

नाशिकच्या गंगापूर धरणातील बोट क्लबकरिता आणलेल्या अत्याधुनिक बोटी इतर कुठेही वळविल्या जाणार नाहीत, असे आश्वस्त करतानाच पर्यटनाच्या विकासासाठी विरोधाचे प्रमाण कमी व्हावे, अशी अपेक्षा पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केली.